# ई - पोलीस पत्रिका

दि.२०/०६/२०२३ अनु.क्र.१०८

## (अमरावती शहर पोलीसांची २०२३ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबलयुक्त व तणावमुक्त पोलीसदल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरूद्ध कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडू न देणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातून पळून जाऊ नयेत.
- "सुरक्षित व सुखकर अमरावती" हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोक सहभागातून साध्य करू.

## भाग-१
## नेमणुक/पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

### रजा

**१.पोआअ/आस्था-५/बालसंगोपन रजा/६८४७/२०२३ अमरावती शहर दिनांक १४/०६/२०२३**

### आदेश

खालील नमुद महिला पोलीस अंमलदार यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या कालावधी करीता त्यांचे बाळाचे संगोपना करीता विशेष रजा शासननिर्णय, वित्त विभाग क्रमांक संकीर्ण-२०१७/प्र.क्रं.२५/सेवा-६, दिनांक २३/७/२०१८ मधील तरतुदीनुसार अटी व शर्तीचे अधिन राहून बालसंगोपन रजा मंजुर करण्यात येत आहे.

| अनु. क्र. | पदनाम/ ब.नं./नाव/नेमणूक | प्रसुतीचा दिनांक | अपत्यांची संख्या | रजा कोणत्या अपत्या करीता | मागणी केलेली रजा |
|---|---|---|---|---|---|
| १ | मपोशि/७६७, मंजुषा वाकपांजर, अ.मा.वा.प्र.कक्ष) | दि.२५/१०/२०१७ | २ | दुस-या | ३० दिवस |
| २ | मपोनाशि/५६४, अर्चना आवारे , (गाडगेनगर) | दि.१४/०८/२०१२ | १ | पहिल्या | ३० दिवस |
| ३ | मपोशि/६७३, दिपाली हाडके, (भातकुली) | दि.२१/०३/२०१५ | १ | पहिल्या | ३० दिवस |
| ४ | मपोशि/१५४३, फुलवंती धुर्वे (पो.मुख्या.) | दि.२९/०५/२०२१ | १ | पहिल्या | ३० दिवस |
| ५ | मपोहवा/१७६२ सुर्वर्णा टेकाडे, (भातकुली) | दि.०६/०४/२००७ | १ | पहिल्या | ३० दिवस |
| ६ | मपोशि/१९०६, वैशाली राउत, (पोलीस मुख्या) | दि.२४/१/२०२३ | १ | पहिल्या | ६० दिवस |

**अटी व शर्ती :-**

१ मुलाचे वय १८ वर्षे होई पर्यंत सदर रजा लागु राहील.

२. एका वर्षामध्ये कमाल २ महिन्याच्या कमाल मर्यादेत सदर रजा घेता येईल.

३. पहिल्या दोन जेष्टतम हयात मुलांकरीता सदर रजा लागु रहील.

४. उपरोक्त महिला कर्मचाऱ्यांना बालसंगोपन रजेच्या कालावधीसाठी रजेवर जाण्याच्या लगतपुर्वी जेवढे वेतन मिळत असेल तेवढीच रजा वेतन देण्यात येईल.

५. सदर कालावधीत रजा प्रवास सवलत (LTC) अनुज्ञेय ठरनार नाही.

## भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरणे

## शिक्षा

**१.पोआअ/विचौ-२/कसुरी/गैरहजर/पोशि-३१७ आतराम +१/६७५६/२०२३ अमरावती शहर दिनांक १२/०६/२०२३.**

## आदेश

खालील नमुद पोलीस अंमलदार यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे नमुद पोलीस अंमलदार हे कर्तव्यावर गैरहजर राहिले असुन सदरचा गैरहजर कालावधी हा सन २०२३ मधील **किरकोळ** रजा मंजुर करण्यात येत आहे. तरी सन २०२३ मधील किरकोळ रजेमधुन एक-एक दिवस नमुद पोलीस अंमलदार यांचे किरकोळ रजे मधुन कपात करावी.

| अ.क्र | पदनाम/ ब. क्र./नाव | नेमणुक ठिकाण | थोडक्यात कसुरी | गैरहजर कालावधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | पोशि/३१७ अविनाश आतराम | पो.मुख्या., अम.शहर | दिनांक ०२/०४/२०२३ रोजी सकाळी ०५.०० मा. पोलीस आयुक्त सा. यांचे निवासस्थान सुरक्षा गार्ड डयुटीवर गैरहजर होते. | दिनांक ०२/०४/२०२३ रोजी २०.१५ वाजता हजर एकुण ०१ दिवस गैरहजर राहिले होते. | **०१ दिवस किरकोळ रजा** |
| २ | पोशि/१४५१ नितीन चतुर | पो.मुख्या., अम.शहर | दिनांक ०७/०४/२०२३ रोजी २०.०० वा.वरिष्ठांना कोणतीही पुर्व सुचना न देता परस्पर गैरहजर राहिले. | दिनांक ०८/०४/२०२३ रोजी १४.०० वाजता हजर एकुण ०१ दिवस गैरहजर राहिले होते. | **०१ दिवस किरकोळ रजा** |

**२. पो.आ.अ/विचौ.-१/निलंबन/कसुरी/सपोनि हिवाळे +३/६७९२/ २०२३ अमरावती शहर दिनांक १३/०६/२०२३**

## निलंबन आदेश

१. ज्याअर्थी तुम्ही १) सपोनि संदिप हिवाळे, नेमणूक - पोलीस स्टेशन नागपूरी गेट, अमरावती शहर, २) सपोउपनि/६४८ राजू मोहोड, ३) पोहवा/८७१ राजेश बोरकुटे, ४) पोशि/१४७ प्रविण उमाळे सर्व नेम. पोलीस मुख्यालय, अमरावती शहर येथे कर्तव्यार्थ असून तुमची दिनांक ०६/०६/२०२३ रोजी अमरावती मध्यवर्ती कारागृहातील शिक्षाधिन न्यायबंदी क्र. सि.६११७ नामे गणेश देविदास शिंदे रा. शिवाजी नगर भंडारवाडा रुम नं.११६ सायन, मुंबई-२२, ह.मु.बेडेकर बिल्डींग रुम नं. १०१, अगसन रोड, दिवा पुर्व ठाणे यास डी.सी.बि.सि.आय.डी. युनिट ए.सी.ई. मुंबई अपराध क्र. २४८/२०२२ कलम ३८५,४५२,५०६,३४ भादवि या गुन्हयात कोर्ट पेशिकरीता अति. मुख्य महानगर दंडाधिकारी, ईसप्लांडा, कोर्ट क्र.३७ मुंबई या कोर्टात दिनांक

०७/०६/२०२३ रोजी हजर करण्याकरीता एस्कॉर्ट डयुटी नेमण्यात आली होती.तुम्ही दिनांक ०६/०६/२०२३ रोजी नमुद न्यायाधिन बंदी यास मध्यवर्ती कारागृह अमरावती येथून ताब्यात घेवून रेल्वेने मुंबई येथे गेले.व दिनांक ०७/०६/२०२३ रोजी अति.मुख्य महानगर दंडाधिकारी, ईसप्लांडा, कोर्ट क्र.३७ मुंबई या कोर्टात कोर्ट पेशी करीता हजर केले. कोर्ट पेशी करुन मुबई ते अमरावती एक्सप्रेसने अमरावती येथे परत येत असतांना नाशिक रोड, रेल्वे स्टेशन दरम्यान आरोपीने हातातील हथकडीमुळे काचा पडत असून हात दुखत आहे तसेच पोट दुखत आहे असे सांगीतल्याने तुम्ही त्याचे हातातील हथकडी सोडून त्यास बाथरुमला नेले व बाथरुम मधून परत आल्यावर त्यास हथकडी न लावता सिटवर बसविले. रात्रीचे दरम्यान तुम्हा सर्व गार्ड मधील अधिकारी/अंमलदारांना झोप लागल्यामुळे आरोपीने या संधीचा फायदा घेवून मनमाड येथे गाडी थांबली असता ००.१० ते ००.४० वा. दरम्यान आरोपी पळून गेला.तुम्हास जाग आल्यानंतर तुम्ही चालत्या गाडीत आरोपीचा शोध घेतला परंतू आरोपी मिळून आला नाही.गार्ड प्रमुख सपोनि संदिप हिवाळे यांनी शेगांव येथे गाडी थांबल्यानंतर लोहमार्ग पोलीस स्टेशन शेगांव येथे तक्रार दिली.त्यावरुन लोहमार्ग पोलीस स्टेशन शेगांव येथे अप.क्र.१७४/२०२३ कलम २२४ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यांत आला आहे.

१. न्यायाधिन बंदी हा सुरक्षागार्डचे अभिरक्षेत असतांना आपण सुरक्षेतेच्या दृष्टीने आरोपीचे चारही बाजुने संतर्क राहुन डयुटी करणे आवश्यक होते. परंतु तुम्ही सर्व गार्ड मधील अधिकारी/अंमलदारांनी सतर्क राहुन डयुटी न केल्यामुळे न्यायाधिन बंदी यास पळून जाण्यास संधी प्राप्त झाली.

२. त्याअर्थी आता मुंबई पोलीस कायदा १९५१ मधील कलम २५ मधील १ (ख) आणि मुंबई पोलीस (शिक्षा व अपिल) नियम १९५६ मधील नियम ३ (१) (अ-२) च्या तरतुदीनुसार, तसेच विभागीय चौकशी नियम पुस्तीका 1991 मधील प्रकरण दोन मधील नियम २.२ (अ) च्या तरतुदीनुसार आदेशाच्या दिनांकापासुन शासन सेवेतुन निलंबित करण्यात येत आहे.

३. त्यानुसार असेही आदेश देण्यात येत आहे की, महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वियेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतुन काढुन टाकने यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ चे नियम ६८(एक) (अ) नुसार निर्वाह भत्ता व त्यावरील अनुज्ञेय महागाई भत्ता देण्यात येईल.

४. आणखी असेही आदेश देण्यात येत आहेत की, जोपर्यंत निलंबनाचे आदेश अस्तित्वात असतील तोपर्यंत १) सपोनि संदिप हिवाळे, नेमणूक - पोलीस स्टेशन नागपूरी गेट, २) सपोउपनि/६४८ राजू मोहोड, ३) पोहवा/८७१ राजेश बोरकुटे, ४) पोशि/१४७ प्रविण उमाळे यांचे निलंबनातील मुख्यालय हे पोलीस मुख्यालय, अमरावती शहर राहील. निलंबन काळात त्यांना सकाळी व सायंकाळी मुख्यालयात हजेरी देणे अनिवार्य राहील. तसेच त्यांना पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांच्या पुर्व परवानगी शिवाय मुख्यालय सोडता येणार नाही. पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांच्या पुर्व परवानगी शिवाय त्यांनी मुख्यालय सोडल्यास ती त्यांची गैरवर्तणुक ठरेल व त्या कारणासाठी वेगळया शिस्तभंगाच्या कारवाईस ते पात्र ठरतील.

५. सदर निलंबनाचा आदेश अस्तित्वात असे पर्यंत आपणास कोणत्याही प्रकारचा खाजगी उद्योग अथवा नोकरी करता येणार नाही.जर या कालावधीत कोणतीही खाजगी नोकरी अथवा उद्योग केल्याचे आढळुन आल्यास आपणाविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्यात येईल.

**३. पो.आ.अ/विचौ.-२/कसुरी/गैरहजर कालावधी/पोशि-१३ सावळे+१/६८३७/ २०२३ अमरावती शहर दिनांक १४/०६/२०२३**

## आदेश

खालील नमुद पोलीस अंमलदार यांचे नावासमोर दर्शविल्याप्रामणे कर्तव्यावर गैरहजर राहिले असुन त्यांच्या वरिष्ठांना कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना न देता कर्तव्यावरुन अनाधिकृतपणे कर्तव्यावर गैरहजर राहिले असल्याने सदरचा गैरहजर कालावधी हा महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम क्रमांक ५० चे तरतुदीनुसार **अर्जित रजा मंजुर** करण्यात येत आहे.

| अ.क्र | नाव व पदनाम | नेमणुक ठिकाण | थोडक्यात कसुरी | कालावधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | पोकॉ/१३ प्रविण सावळे | पो.मुख्या. अम.शहर | दिनांक ०१/०३/२०२३ पासुन ते दिनांक ०९/०३/२०२३ पर्यत वरिष्ठांना कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना देता कर्तव्यावरुन अनाधिकृतपणे गैरहजर राहिले. | दिनांक ०१/०३/२०२३ पासुन ते दिनांक ०९/०३/२०२३ पर्यत एकुण ०९ दिवस गैरहजर राहिले होते. | **एकुण ०९ दिवस अर्जित रजा.** |
| २ | पोकॉ/१६७० प्रफुल तंतरपाळे | पो.स्टे. वलगाव | उजळणी कोर्स सत्र क्रमांक ५ प्रशिक्षणा दरम्यान दिनांक ०३/०४/२०२३ रोजी १६.०० वाजतागणणेवरुन वरिष्ठांना कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना देता कर्तव्यावरुन अनाधिकृतपणे गैरहजर राहिले. | दिनांक ०३/०४/२०२३ पासुन ते दिनांक ०७/०४/२०२३ पर्यत एकुण ०४ दिवस गैरहजर राहिले होते. | **एकुण ०४ + ०६ = १० दिवस अर्जित रजा.** |
| | | | उजळणी कोर्स सत्र क्रमांक ५ प्रशिक्षणा दरम्यान दिनांक १५/०४/२०२३ रोजी २०.०० वाजतागणणेवरुन वरिष्ठांना कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना देता कर्तव्यावरुन अनाधिकृतपणे गैरहजर राहिले. | दिनांक १५/०४/२०२३ पासुन ते दिनांक २१/०४/२०२३ पर्यत एकुण ०६ दिवस गैरहजर राहिले होते. | |

## सेवानिवृत्त

**१. पो.आ.अ/पशा-१/निवयो-सेनि/पोउपनि/जढाळे/६९९०/२०२३/ अमरावती शहर दिनांक १६/०६/२०२३**

## आदेश

श्री. राजेंद्र रामकृष्ण जढाळे, पोलीस उपनिरीक्षक, नेमणुक पो.स्टे.गाडगे नगर, अमरावती शहर यांची जन्म दि.१५/०६/१९६५ आहे. श्री.राजेंद्र रामकृष्ण जढाळे हे दि.१५/०६/२०२३ रोजी वयाची ५८ वर्ष पुर्ण करीत असल्याने त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) १९८२, मधील नियम १० (१) अन्वये दि.३०/०६/२०२३ ला मा.नं.पासुन नियत वयोमानानुसार शासकीय सेवेतुन सेवानिवृत्त करण्यात येत आहे.

**भाग-३**

## वेतन/वेतन संरचना/वेतन निश्चितीती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण

## संकीर्ण

**१.पोआअ/पशा-१/पगार बंद आदेश/सपोनि-राऊत/६९१७/२०२३ अमरावती शहर दिनांक १५/०६/२०२३.**

## आदेश

श्री. राहुलकुमार राऊत, सहायक पोलिस निरीक्षक, नेमणुक नियंत्रण कक्ष, अमरावती शहर हे दि.२६.०५.२०२३ पासुन रुग्णनिवेदन सादर करुन परस्पर कर्तव्यावर अनुपस्थित असल्याने त्यांचे माहे.०६/२०२३ व त्यापुढील वेतन पुढील आदेशापर्यंत आहंरित करुन संवितरित करण्यात येवु नये.

**(सागर पाटील)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,
पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस